**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय / महोदया,

जम्मू आणि काश्मिर राज्यातील अतिरेक्यांच्या कारवायांमुळे विस्थापित झालेले नागरिक आणि या कारवायांना तोंड देण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या लष्करी/निमलष्करी व इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या पाल्यांना विशेष शैक्षणिक सवलत देण्याच्या अनुषंगाने मा.विभागीय सहसंचालक (उ.शि.), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी पाठविलेले जा.क्र.विससं/उशि/कोवि/जा.का.विप्र.२०१७/७१६, दि.०२ मे,२०१७ चे पत्र आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित केले आहे. त्यानुसार विषयांकित कोटयातून प्रवेश मिळविण्यासाठी संपर्क करणा-या विद्यार्थी व पालकांनी दि.३० जून २०१७ पूर्वी शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,पुणे - ४११ ००१ यांचेकडे अर्ज करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.

कळावे,

आदेशान्वये,
I/Cउपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 16
दि.: 17 MAY 2017

# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४

E-mail: jdhekop@gmail.com

फोन क्र. : (०२३१) २५३५४००,२५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००


जा.क्रं.विससं/उशि/कोवि/ज.का.वि.प्र/२०१७/716 दिनांक :२८/०४/२०१७

2 MAY 2017

प्रति,

१.प्राचार्य,

सर्व अशासकीय अनुदानित कला,

वाणिज्य,विज्ञान,विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,

(अनुदानित /विनाअनुदानित)कोल्हापूर विभाग,कोल्हापूर.

२.मा.कुलसचिव,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

Shivaji University, Kolhapur
Inward No. 6679
Date 04/05/17

**विषय :-जम्मू आणि काश्मिर राज्यातील अतिरेक्यांच्या कारवायांमुळे विस्थापित झालेले नागरिक आणि या कारवायांना तोंड देण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या लष्करी/निमलष्करी व इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या पाल्यांना विशेष शैक्षणिक सवलत.**

**संदर्भ:-**संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/ज.क.वि.प्र/मवि-१/२०१७/५००८ दि.१९/०४/२०१७

उपरोक्त विषयास अनुसरुन संचालनालयाचे संदर्भीय पत्रातील नमूद सूचनेनुसार जम्मू आणि काश्मिर राज्यातील अतिरेक्यांच्या कारवायांमुळे विस्थापित झालेले नागरिक आणि या कारवायांना तोंड देण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या लष्करी/निमलष्करी व इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या पाल्यांना विशेष शैक्षणिक सवलत देण्याबाबत शासन निर्णय क्र.टीईएम८०९६/(७४८८)/टी.ई.१ दि.२४ जून १९९६ व शानन निर्णय क्र.जेकेसी-२००९/(३७/०९)मशि-२ दि.२८ जून २००९ अन्वये निर्देश देण्यात आलेले आहेत.

सदर शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त अभ्यासक्रमांसाठी प्रत्येक अनुदानित व विना-अनुदानित(टप्प्यांवरील) पदवी व पदविका महाविद्यालयात **एक जागा अतिरिक्त निर्माण करुन** प्रवेश देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.त्यानुसार विहीत नमून्यात अर्ज मा.संचालक(उच्च शिक्षण)महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडे करावयाचा आहे.

जम्मू काश्मिर कोटयातून विद्यार्थी निवड करण्यासाठी गुणवत्ता व प्राधान्यक्रमानुसार प्रवेश द्यावयाचा असल्याने अर्ज करण्यासाठी अंतिम दिनांक ठरविणे आवश्यक आहे.त्यानुसार सर्व संबंधीतांनी संचालनालयाकडे अर्ज करण्यासाठी **दि.३० जून २०१७** हा अंतिम दिनांक निश्चित करण्यात आलेला आहे.सदर सूचना संचालनालयाच्या व कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

विषयांकित कोटयातून प्रवेश मिळविण्यासाठी संपर्क करणाऱ्या विद्यार्थी व पालकांना **दि.३० जून २०१७** पूर्वी संचालनालय,पुणे यांचेकडे अर्ज करावेत अशा सूचना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात.**दि.३० जून २०१७** पर्यंत आलेले सर्व अर्ज विचारात घेऊन याबाबत कार्यवाही करण्यास आपणास कळविण्यात येईल.तोपर्यंत सदर कोटयातून विद्यार्थ्यांना परस्पर आपल्या स्तरावरुन प्रवेश देण्यात येवू नयेत.

विभागीय सहसंचालक (उ.शि.)
कोल्हापूर विभाग,कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
आवक विभाग
3 MAY 2017
878

प्रत -१. मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य पुणे, १